Publication: Mumbai Chouffer

Date: Friday, 31st January, 2015

Edition: Mumbai

# हॅपी इंडिया प्रोजेक्टमध्ये मुंबईची पोरं हुश्शार

मुंबई - हॅपी इंडिया प्रोजेक्टमध्ये देशभरातून सहभागी झालेल्या पंधराहजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांमधून अंतिम २५ संघ निवडण्यात आले आहेत. त्यात मुंबईच्या सहा संघाचा समावेश असून, मुंबईकरांसाठी ही गौरवाची बाब आहे. इंडियाफर्स्ट लाइफ इन्शुरन्सने हॅपी इंडिया मोहीम राबवली होती.

हॅपी इंडियाच्या माध्यमातून ११ ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण, आरोग्य, ऊर्जा संधारण, सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा आणि आर्थिक सर्वसमावेशकता अशा महत्त्वपूर्ण विषयांवर आपल्या कल्पना मांडण्यात आल्या. त्यातील निवडण्यात आलेल्या २५ संघांमधील प्रत्येक संघाला ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार असून, त्याद्वारे विद्यार्थ्यांनी मांडलेल्या कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याची संधी दिली जाणार आहे. यात त्या विद्यार्थ्यांना विविध विश्लेषकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभेल. इंडिया फर्स्ट लाइफ इन्शुरन्सचे मुख्य विपणन अधिकारी मोहित रोचलानी याबाबत म्हणाले की, देशभरातील शाळांमधून आम्हाला मिळालेल्या प्रतिसादाने आम्ही भारावून गेलोत. मुंबईतील सहा संघांनी अंतिम फेरीत स्थान मिळवल्यामुळे मुंबईकरांसाठी ही अभिमानाची बाब आहे. मुंबईतल्या सहा संघांत रेयान इंटरनॅशनल, पोदार इंटरनॅशनल, डी.जी. खेतान इंटरनॅशनल इत्यादी शाळांतील विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

A Joint Venture of
Bank of Baroda Legal & General Andhra Bank